


दैनिक
# अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com

खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मिडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला
फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स
एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

वर्ष : ०६ | अंक : ४७, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, बुधवार, दि.३० सप्टेंबर २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

# भारतीय सैन्यातील निवृत्त अग्निवीरांना महाराष्ट्र सरकारकडून गिफ्ट

## राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मोठा निर्णय

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२९, मुंबई :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली राज्य मंत्रिमंडळाची आज मुंबईतील मंत्रालयात महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत अनेक मोठे आणि महत्त्वाचे निर्णय घेण्यात आला आहे. विशेष म्हणजे या निर्णयांमध्ये भारतीय सैन्यात अग्निवीर म्हणून चार वर्षांची नोकरी केलेल्या जवानांसाठी राज्य सरकारने मोठा निर्णय घेतला आहे.

भारतीय सैन्यात देशाची सेवा केलेल्या जवानांना राज्य सरकारकडून शासकीय नोकरीची संधी दिली जाणार आहे. म हाराष्ट्रातील माजी अग्निवीरांसाठी शासकीय नोकरीत दहा टक्के समांतर आरक्षण देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. माजी अग्निवीरांना गट – क मधील गणवेशधारी सेवांच्या पदांवर नियुक्ती मिळणार आहे. सैन्य दलातून चार वर्षांच्या सेवेनंतर निवृत्त झालेल्या अग्निविरांना सेवेत दाखल करून घेण्याचे धोरण राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत निश्चित करण्यात आले आहे.

राज्य मंत्रिमंडळाच्या आजच्या बैठकीत महाराष्ट्र वैरण विकास धोरण जाहीर करण्यात आलं आहे. राज्यातील पशुधनासाठी आवश्यक चाऱ्याची उपलब्धता निश्चित होणार आहे. जिल्हानिहाय चारा उत्पादन, लागवडीयोग्य गवतांची यादी, वैरण उपयुक्त वृक्षांची यादी, सुधारित चारा पिके, पारंपरिक आणि अपारंपरिक चारा स्त्रोत यांचा साकल्याने विचार करण्यात आला आहे. विविध शासकीय वैरण विकास योजनांचे नियोजन करण्यात येणार आहे. तसेच या निर्णयाने दुग्धव्यवसाय आणि पशुपालन या शेतीपूरक व्यवसायास चालना मिळणार आहे.

राज्य मंत्रिमंडळ बैठकीत छत्रपती संभाजीनगरमधील वाळूज येथे दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालयाबाबत निर्णय झाला आहे. या ठिकाणी आता न्यायालय होणार आहे. न्यायालय स्थापनेस व त्यासाठीच्या न्यायिक अधिकारी व कर्मचारी यांच्या पदांना व खर्चाच्या तरतुदीस मंजुरी मिळाली.



मंत्रिमंडळ बैठकीत महाराष्ट्र लॉजिस्टिक्स धोरण – २०२४ मध्ये सुधारणा करण्यात आली आहे. धोरणांतर्गत झोन – ३ मध्ये स्थापन होणाऱ्या लॉजिस्टिक्स पार्क्स, पायाभूत सुविधा प्रकल्पांच्या विशेष भांडवली प्रोत्साहन मिळणार. जिल्हानिहाय विकसित करण्यात येणाऱ्या लॉजिस्टिक्स पार्कची कमाल संख्येचा निकष रद्द. झोन १, २ मधील पार्कना शंभर टक्के, तर झोन ३ मधील पार्कना ७५ टक्के मुद्रांक शुल्कात सवलत. राज्यस्तरीय समि त्यांच्या रचनेत सुधारणा करण्यात आली आहे.

**मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आलेलेल इतर निर्णय :**

- न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालयाचा २ हजार ७६१ पदांचा सुधारित आकृतीबंध मंजूर. (गृह विभाग)
- 'महाराष्ट्र कारागृहे सुधारसेवा अधिनियम, २०२५ मध्ये सुधारणा करण्यास मंजुरी. (गृह विभाग)
- नागपूर जिल्ह्यातील मौ. बेला (ता. उमरेड) येथील २ हेक्टर ३७ आर शासकीय जमीन नागपूर- म्हाडास देण्यास मंजुरी. म्हाडा याठिकाणी गरजू व गरिबांसाठी परवडणारी घरे प्रकल्प साकारणार. (महसूल, नोंदणी व मुद्रांक शुल्क)
- सूर्या प्रकल्पग्रस्तांना ५६ वर्षानंतर न्याय. पालघरच्या नेवाळे, हनुमाननगरम धील जमिनींच्या फेरवाटपास मान्यता. प्रकल्पग्रस्तांची नावे सातबारावर नोंदण्यास मान्यता. (महसूल, नोंदणी व मुद्रांक शुल्क)
- मुंबईतील वांद्रे (ता.अंधेरी) येथील भुखंडाच्या भाडेपट्ट्याच्या नुतनीकरणास मंजुरी. नॅशनल सोसायटीज फॉर क्लीन सिटीज सामाजिक संस्थेस दिलेल्या ६ हजार ११० चौ. मी. जमिनीच्या भाडेपट्ट्याच्या नुतनीकरणास मंजुरी. (महसूल, नोंदणी व मुद्रांक शुल्क)
- मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर – सर्किट बेंचकरिता (फिरते खंडपीठ) विविध संवर्गातील ४५९ पद निर्मितीस मंजुरी. गट अ ची २०, गट ब – ३५, गट क – २७६ आणि गट ड ची १२८ पदे. या पदांसाठी अनुषंगाने येणाऱ्या खर्चाच्या तरतुदीस मंजुरी. (विधि व न्याय विभाग)

## ठाकरे गटाचे विभागप्रमुख प्रदीप पुर्णेकर यांच्यावर गोळीबार



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२९, ठाणे :** ठाणे शहरात गोळीबाराची घटना घडली आहे. विशेष म्हणजे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या नेत्यावर अज्ञात आरोपींकडून गोळीबार करण्यात आला आहे. मि ळालेल्या माहितीनुसार, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे विभागप्रमुख प्रदीप पुर्णेकर यांच्यावर गोळीबार झाला आहे. या गोळीबाराच्या घटनेत प्रदीप पुर्णेकर हे जखमी झाल्याची माहिती आहे. त्यांना दोन गोळ्या लागल्याची माहिती आहे. गोळीबारानंतर आरोपी घटनास्थळावरुन फरार झाले. गोळीबाराच्या या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.

प्रदीप पुर्णेकर यांच्यावर ठाण्यातील मनोरमानगर परिसरात गोळीबार झाला. या गोळीबाराच्या घटनेनंतर स्थानिक नागरिकांनी पुर्णेकर यांना उपचारासाठी खासगी रुग्णालयात दाखल केलं. स्थानिकांनी पुर्णेकर यांना इन्फीनीटी रुग्णालयात नेलं. तिथे त्यांच्यावर उपचार सुरु आहेत. या रुग्णालयाच्याबाहेर मोठी गर्दी जमा झाल्याची माहिती आहे. तसेच घटनेची माहिती मिळताच अपर पोलीस आयुक्त अशोक दुधे रुग्णालयात दाखल झाले आहेत.

प्रदीप पुर्णेकर यांच्या पत्नी विजेता पुर्णेकर यांनी गेल्यावर्षी पार पडलेल्या ठाणे महापालिकेच्या निवडणुकीत निवडणूक लढवली होती. त्या उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या अधिकृत उमेदवार होत्या. पुर्णेकर पक्षाचे विभागप्रमुख देखील आहेत. त्यांच्यावर अचानक अज्ञाताकडून गोळीबार करण्यात आल्याने ठाण्यात खळबळ उडाली आहे.

ठाणे महापालिका निवडणुकीत मनोरमा नगर भागातील प्रभाग क्रमांक : ३ मधून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे विभागप्रमुख असलेल्या प्रदीप पुर्णेकर यांच्या पत्नी विजेता पुर्णेकर आणि बंधू जयनाथ पुर्णेकर यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने निवडणूक लढवली होती. या निवडणुकीत त्यांचा पराभव झाला होता. तसेच प्रदीप यांचे बंधू जयनाथ ठाणे महानगरपालिकेचे माजी नगरसेवक आहेत. माजी खासदार राजन विचारे यांचे निकटवर्तीय अशी प्रदीप पुर्णेकर यांची ओळख आहे.

# अमली पदार्थ विरोधी पथकाची एफडीए सोबत संयुक्त कारवाई

## २,२२० कॅप्सुल्स जप्त, तीन आरोपींवर गुन्हा दाखल !

**अक्षराज : अभिनव येलवे**

**दि.२९, पनवेल (नवी मुंबई) :** डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शनशिवाय प्रिगाबालिन (Pregabalin) कॅप्सुल्सची बेकायदेशीर विक्री आणि साठा केल्याप्रकरणी नवी मुंबई पोलिसांच्या अमली पदार्थ विरोधी पथकाने अन्न व औषध प्रशासनाच्या (एफडीए) अधिकाऱ्यांच्या मदतीने खांदेश्वर परिसरात कारवाई केली. या कारवाईत आसूड गावातील 'महादेव मेडिकल स्टोअर' येथे छापा टाकून सुरुवातीला १५० प्रिगाबालिन कॅप्सुल्स जप्त करण्यात आल्या. त्यानंतर करण्यात आलेल्या तपासात या औषधांचा बेकायदेशीर पुरवठा करणाऱ्या व्यक्तीकडून आणखी २,०७० कॅप्सुल्स हस्तगत करण्यात आल्या. या कारवाईत एकूण २,२२० प्रिगाबालिन कॅप्सुल्स जप्त करण्यात आल्या आहेत.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, खांदेश्वर येथील आसूड गाव परिसरात असलेल्या महादेव मेडिकल स्टोअरमध्ये प्रिगाबालिन कॅप्सुल्सची विक्री होत असल्याची माहिती अमली पदार्थ विरोधी पथकाला मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी अन्न व औषध प्रशासनाच्या




अधिकाऱ्यांच्या सहकार्याने मेडिकल स्टोअरची तपासणी केली. यावेळी वैद्यकीय प्रिस्क्रिप्शनशिवाय औषधांची विक्री केल्याचा संशय आढळून आला. तसेच या कॅप्सुल्सच्या खरेदी-विक्रीची आवश्यक नोंद रजिस्टरमध्ये करण्यात आलेली नसल्याचे तपासात समोर आले.

मेडिकल स्टोअरमधून १५० कॅप्सुल्स जप्त केल्यानंतर पोलिसांनी या औषधांचा पुरवठा कुठून होत होता, याचा तपास सुरू केला. तपासादरम्यान विशाल जाधव याच्याकडून विनापरवाना बाळगण्यात आलेल्या आणखी २,०७० प्रिगाबालिन कॅप्सुल्स पोलिसांनी हस्तगत केल्या. त्यामुळे या कारवाईत जप्त करण्यात आलेल्या कॅप्सुल्सची एकूण संख्या २,२२० झाली आहे.

या प्रकरणात मेडिकल स्टोअरम धील संबंधित व्यक्तींसह औषधांचा




बेकायदेशीर पुरवठा करणाऱ्यांविरोधात कारवाई करण्यात आली आहे. एकूण तीन आरोपींवर औषधे व प्रसाधने कायदा (Drugs and Cosmetics Act) तसेच भारतीय न्याय संहितेच्या (इछड) संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. जप्त करण्यात आलेल्या औषधांचा स्त्रोत, त्यांची खरेदी-विक्री तसेच या साखळीत आणखी कोणाचा सहभाग आहे का, याचा तपास पोलीस करीत आहेत.

प्रिगाबालिन हे डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार विशिष्ट वैद्यकीय उपचारांसाठी वापरले जाणारे औषध आहे. त्यामुळे अशा औषधांची विनाप्रिस्क्रिप्शन विक्री किंवा अनधिकृत साठा केल्यास संबंधित नियमांचे उल्लंघन होऊ शकते. या पार्श्वभूमीवर नवी मुंबई पोलिसांच्या अमली पदार्थ विरोधी पथकाने औषध विक्री केंद्रांवर लक्ष ठेवण्यास सुरुवात केली असून, बेकायदेशीर औषध विक्रीविरोधात कारवाई सुरू ठेवण्यात येणार असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले.

ही कारवाई वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप निगडे यांच्या मार्गदर्शनाखाली अमली पदार्थ विरोधी पथकाने अन्न व औषध प्रशासनाच्या सहकार्याने केली.

# दुष्काळाचा 'कोरडा' जीआर खा.प्रणिती शिंदेंकडून शासन निर्णयाची होळी!

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.२९, पंढरपूर :** मोठा गाजावाजा करून जाहीर करण्यात आलेल्या कर्जमाफी योजनेचा लाभ सोलापूर जिल्ह्यातील केवळ ६ टक्के शेतकऱ्यांपर्यंत पोहोचल्याचा आरोप करत, दुष्काळ जाहीर करूनही शेतकऱ्यांच्या हातात थेट मदत पडत नसल्याच्या निषेधार्थ खासदार प्रणिती शिंदे यांच्या नेतृत्वाखाली मंगळवेढा तालुक्यातील भाळवणी येथे फडणवीस सरकारच्या दुष्काळी शासन निर्णयाची प्रतीकात्मक होळी करण्यात आली. यावेळी सरकारच्या धोरणांवर जोरदार टीका करत शेतकऱ्यांना सरसकट मदत, कर्जमाफी, पीकविमा आणि चारा उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली.

भाळवणी येथे फडणवीस सरकारच्या दुष्काळी शासन निर्णयाची प्रतीकात्मक होळी करण्यात आली. यावेळी उपस्थित शेतकरी, पदाधिकारी व कार्यकर्ते.

कर्जमाफीचा लाभ फक्त ६ टक्के शेतकऱ्यांना

यावेळी बोलताना खासदार प्रणिती शिंदे म्हणाल्या की, सरकारने मोठा गाजावाजा करून कर्जमाफी योजना जाहीर केली; मात्र सोलापूर जिल्ह्यात आतापर्यंत केवळ ६ टक्के शेतकऱ्यांना त्याचा लाभ मिळाला आहे. उर्वरित शेतकरी लाभाच्या प्रतीक्षेत आहेत. सरकारी मानसिकतेत शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी देण्याची नसून उद्योगपतींना कर्जमाफी देण्याची आहे, असा आरोप त्यांनी केला.

**सरसकट मदत, तात्काळ टँकर, १००% पीकविमा**

यंदा पावसाने हुलकावणी दिल्यामुळे जिल्ह्यात दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. दुष्काळ जाहीर केल्यानंतरही पीक नुकसानीचे पंचनामे करण्याची आवश्यकता कशासाठी? शेतकऱ्यांना म दत करायची असेल तर सरसकट मदत जाहीर करा. पाण्याच्या टँकरसाठी प्रस्ताव मागण्याऐवजी दुष्काळ जाहीर झाल्यानंतर तात्काळ टँकर मंजूर करा. पीक



नुकसानीची १०० टक्के नोंद करून पीकविम्याची रक्कम मिळाली पाहिजे, अशी मागणी त्यांनी केली.

**चारा छावण्यांऐवजी चारा डेपोची मागणी**

दुष्काळाच्या काळात जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर होणार असल्याने चारा छावण्यांपेक्षा चारा डेपो सुरू करण्याची गरज असल्याचेही खासदार शिंदे यांनी सांगितले. चारा छावण्या सुरू केल्या तर गैरव्यवहार होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना आणि पशुपालकांना थेट चारा उपलब्ध करून देण्यासाठी चारा डेपो सुरू करावेत, अशी भूमिका त्यांनी म ांडली.

**'फसवा जीआर' असल्याचा काँग्रेसचा आरोप**

भाषणादरम्यान खासदार प्रणिती शिंदे यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित करत फडणवीस सरकारचा हा जीआर फसवा आहे, अशी टीका केली.

**शेतकऱ्यांच्या मागण्या...**

- सरसकट कर्जमाफी द्या
- दुष्काळ जाहीर केल्यानंतर तात्काळ टँकर मंजूर करा
- १००% पीकविमा रक्कम द्या
- चारा डेपो सुरू करा
- पाण्याचा प्रश्न सोडवा

**प्रशांत साळे यांची भूमिका...**

काँग्रेसचे तालुकाध्यक्ष प्रशांत साळे यांनी तालुक्यातील शेती, पाणी आणि शेतकरी प्रश्नांवर काँग्रेसच्या माध्यमातून सातत्याने आंदोलने करण्यात आली असून, खासदार प्रणिती शिंदे यांच्या माध्यम ातून हे प्रश्न शासन दरबारी मांडले जात असल्याचे सांगितले. शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळाली पाहिजे, अशी मागणी त्यांनी केली.

यावेळी काँग्रेसचे राज्यसचिव अॅड. रविकिरण कोळेकर, तालुकाध्यक्ष प्रशांत साळे, विष्णू चोगुले, पांडुरंग चोगुले, सरपंच लक्ष्मण गायकवाड, मच्छिंद्र पाटील, किशोर भंडगे, रावसाहेब बेंडगे, विठ्ठल लोंढे, विठ्ठल लोंढे, निसार तांबोळी, शहाजान पटेल, नवनाथ ढगे, विनायक माळी, संदीप पवार, तानाजी आवळेकर, गंगादेव शिंदे, ज्ञानेश्वर सोडिकर, धनाजी चव्हाण, शिवाजी गाडेकर, यांच्यासह ग्रामस्थ व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी सरकारविरोधी घोषणा देत शेतकऱ्यांना तातडीने दुष्काळी मदत, सरसकट कर्जमाफी, पीकविम्याचा लाभ, पाण्याची पूर्तता आणि जनावरांसाठी चारा उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी उपस्थित शेतकऱ्यांनी केली.




## सोशल मीडियावरचे श्रीमंतीचे प्रदर्शन ठरू शकते धोकादायक

आजच्या डिजिटल युगात सोशल मीडिया हा आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे. आनंदाचे क्षण, कौटुंबिक समारंभ, पर्यटन, सण-उत्सव, वाढदिवस किंवा एखादे यश मिळाले की त्याचे फोटो आणि व्हिडिओ सोशल मीडियावर शेअर करण्याची सवय अनेकांना लागली आहे. मात्र, सोशल मीडियावर व्यक्त होण्याचे स्वातंत्र्य आणि वैयक्तिक सुरक्षितता यामध्ये योग्य समतोल राखणे अत्यंत आवश्यक आहे. नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या बातमीत सोशल मीडियावर प्रसिद्ध झालेल्या माहितीचा गैरफायदा घेत घरात चोरी झाल्याचे समोर आले आहे. ही घटना सोशल मीडिया वापरकर्त्यांसाठी निश्चितच सावध करणारी आहे.

आज अनेकजण आपल्या श्रीमंतीचे प्रदर्शन सोशल मीडियावर करतात. महागडे दागिने, रोकड, आलिशान घर, नवीन वाहन, परदेशातील प्रवास, घरातील मौल्यवान वस्तू, मोठ्या समारंभातील खर्च यांचे फोटो आणि व्हिडिओ सर्रास प्रसिद्ध केले जातात. आपल्याला हे केवळ आनंदाचे प्रदर्शन वाटत असले तरी गुन्हेगारांसाठी ही माहिती महत्त्वाची ठरू शकते. एखादी व्यक्ती घराबाहेर गेल्याचे किंवा काही दिवस पर्यटनासाठी गेल्याचे सोशल मीडियावर जाहीर केल्यास त्या व्यक्तीचे घर रिकामे असल्याची माहिती अनोळखी व्यक्तींना सहज मिळू शकते. त्यामुळे चोरी, फसवणूक किंवा इतर गैरप्रकारांना अप्रत्यक्षपणे संधी मिळू शकते.

विशेषतः लहान मुले, कुटुंबातील सदस्य, घराचा पत्ता, शाळेचे नाव, रोजची दिनचर्या, कार्यालयाची माहिती, प्रवासाचे वेळापत्रक किंवा आपण सध्या कुठे आहोत, याची माहिती सार्वजनिकपणे देणे टाळले पाहिजे. कौटुंबिक वाद, आर्थिक व्यवहार, वैयक्तिक कागदपत्रे, मोबाईल क्रमांक, ओळखपत्रे, बँकविषयक माहिती यांसारख्या गोष्टी सोशल मीडियावर शेअर करणेही धोकादायक ठरू शकते. सोशल मीडिया वापरताना काही साध्या पण महत्त्वाच्या गोष्टींची काळजी घेणे आवश्यक आहे. सोशल मीडिया खात्यांची privacy settings तपासावीत. अनोळखी व्यक्तींच्या friend request किंवा follow request स्वीकारू नयेत. मजबूत पासवर्ड आणि दोन-स्तरीय सुरक्षा (Two-Factor Authentication) वापरावी. संशयास्पद लिंक, संदेश किंवा ऑफरवर क्लिक करू नये. आपले फोटो आणि माहिती कोण पाहू शकते, यावर नियंत्रण ठेवावे. विशेषतः प्रवासाची माहिती प्रवासाला निघण्यापूर्वी किंवा आपण घराबाहेर असतानाच सार्वजनिक करण्याऐवजी परतल्यानंतर शेअर करणे अधिक सुरक्षित ठरू शकते.

सोशल मीडिया हा माहिती, संवाद आणि मनोरंजनाचा प्रभावी माध्यम आहे; मात्र त्याचा वापर विवेकाने झाला पाहिजे. 'दाखवण्यापेक्षा सुरक्षित राहणे महत्त्वाचे' हे प्रत्येकाने लक्षात ठेवले पाहिजे. सोशल मीडियावर प्रसिद्धी मिळवण्याच्या नादात आपल्या घराची, संपत्तीची आणि कुटुंबाची सुरक्षितता धोक्यात येणार नाही, याची काळजी घेणे ही प्रत्येक वापरकर्त्याची जबाबदारी आहे. डिजिटल जगात सावधगिरी हीच खरी सुरक्षा आहे.

**– श्याम ठाणेदार**

## पळसगाव परिसरात जंगली डुक्करांचा संचार वाढला

**दि.२९, चिमूर :** तालुक्यातील पळसगाव परिसरात जंगली डुकरांचा मुक्त संचार वाढला असल्याने नागरिकांच्या सुरक्षेसाठी तातडीने उपाययोजना करण्यासंबंधाने शिवशाही प्रतीष्ठाणचे चंद्रपूर जिल्हा अध्यक्ष शुभम गजभिये यांनी वनपरिक्षेत्राधिकारी पळसगाव यांना निवेदन दिले. पळसगाव परिसरातील गावात मागील काही दिवसांपासून जंगली डुकरांचा मुक्त संचार मोठ्या प्रमाणात वाढला आहे. जंगली डुकरांचे कडप गावात तसेच शेतशिवारात वारंवार येत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. विशेषत: सकाळी व सायंकाळच्या वेळी नागरिक, शेतकरी तसेच शाळकरी विद्यार्थी यांची ये-जा सुरू असते. अशावेळी जंगली डुकरांकडून नागरिकांवर हल्ला होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच शेतातील पिकांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. त्यामुळे वन विभागाने सदर बाबीची तातडीने दखल घेऊन गावालगतच्या परिसराची पाहणी करावी, जंगली डुकरांचा बंदोबस्त करण्यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात तसेच नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी वन विभागाचे पथक नियुक्त करून गस्त वाढवावी अशी मागणी निवेदनातुन शिवशाही प्रतीष्ठाणचे चंद्रपूर जिल्हा अध्यक्ष शुभम गजभिये यांनी केली आहे.

# नरेंद्र मोदी नवसाला पावणारे नेतृत्व !!

केंद्रीय निवडणूक आयोगाचे मुख्य आयुक्त ज्ञानेश कुमार हे सध्या देशाच्या राजकारणाच्या केंद्रस्थानी आले आहेत. त्यांच्या कार्यपद्धतीवर विरोधकांनी थेट हल्लाबोल चढवला असून, देशभरात 'व्होट चोरी'चा नारा घुमू लागला आहे. काँग्रेसने या मुद्द्यावर देशव्यापी आंदोलनाची भूमिका घेतली आहे. महाराष्ट्रातही या वादाची तीव्रता वाढली असून, अभिजीत दीपके यांनी २ ऑक्टोबरला तर उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांनी संयुक्तपणे ४ ऑक्टोबरला मुंबईत निवडणूक आयोगाविरोधात आंदोलनाची हाक दिली आहे. मतदान प्रक्रियेत गैरप्रकार झाला असल्याचा आरोप करत, संबंधित निवडणुका रद्द करून फेरनिवडणूक घेण्याची मागणी उद्धव ठाकरे यांनी केली आहे. या संपूर्ण प्रकरणात एक महत्त्वाचा प्रश्न विरोधक उपस्थित करत आहेत. निवडणूक आयोग ही स्वायत्त आणि घटनात्मक संस्था आहे. तिच्यावर आरोप झाले तर तिने स्वतः स्पष्टीकरण देणे अपेक्षित आहे. मग त्यावर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस का उत्तर देत आहेत, हा विरोधकांचा सवाल आहे. काही महिन्यांपूर्वी लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी पत्रकार परिषद घेऊन मतदार याद्यांमधील कथित घोळ आणि दुबार मतदारांचे पुरावे सादर केले होते. त्यावेळी निवडणूक आयोगाने थेट उत्तर देण्याऐवजी, देवेंद्र फडणवीस यांनी राहुल गांधी यांना खुले पत्र लिहून त्यांच्या आरोपांचे खंडन केले होते. त्यामुळे फडणवीस हे निवडणूक आयोगाचे अधिकृत वकीलपत्र घेऊन काम करत आहेत का, असा टोला विरोधकांनी लगावला होता.

या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री फडणवीस यांनी विरोधकांवर अत्यंत खोचक शब्दांत टीका केली आहे. नागपूर येथील एका कार्यक्रमात बोलताना ते म्हणाले, विरोधक म्हणतात व्होट चोरी झाली. पण मला वाटते त्यांचा मेंदूच चोरीला गेला आहे. मी पंतप्रधान मोदी यांना विनंती करणार आहे की, अशी एखादी चौकशी समिती तयार करता येईल का, जी विरोधकांचा चोरीला गेलेला मेंदू परत आणून देईल. त्यांनी तो मेंदू गहाण तर ठेवला नाही ना, याचीही चौकशी झाली पाहिजे. फडणवीस यांच्या या 'मेंदू चोरी'च्या टीकेला प्रत्युत्तर देताना विरोधकांनी जुन्या राजकीय घडामोडींचा दाखला दिला आहे. विरोधकांच्या मते, मेंदू चोरीचा प्रश्न उपस्थित करायचाच असेल तर त्याची सुरुवात २०१९ पासून करावी लागेल. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत भाजप-शिवसेना युतीला स्पष्ट बहुमत मिळाले होते. मात्र मुख्यमंत्रीपदाच्या मुद्द्यावरून युती तुटली आणि उद्धव ठाकरे यांनी काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेससोबत महाविकास आघाडी स्थापन करून सत्ता स्थापन केली. भाजपच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला गेला. हा भाजपसाठी मोठा धक्का होता. त्यानंतर पुढील अडीच वर्षांत महाराष्ट्राच्या राजकारणाने वेगळे वळण घेतले. विरोधकांच्या आरोपानुसार, भाजपने केंद्रातील सत्तेचा आणि तपास यंत्रणांचा वापर करून महाविकास आघाडीतील नेत्यांवर दबाव आणण्यास सुरुवात केली. केली. इंड ईडी, सीबीआय, प्राप्तिकर विभागाच्या चौकशांचा ससेमिरा सुरू झाला. या दबावतंत्राचा परिणाम म्हणूनच शिवसेनेतील एकनाथ शिंदे यांच्यासह ४० आमदारांनी बंड केले आणि शिवसेना पक्ष आणि चिन्हावर दावा सांगितला. केवळ आमदारच नाहीत तर पक्षच ताब्यात घेण्याची रणनीती यशस्वी झाली. त्यानंतर हाच प्रयोग राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये झाला आणि अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली आणखी एक गट सत्तेत सामील झाला. एकेकाळी भ्रष्टाचाराचे आरोप असलेले नेते भाजपसोबत गेल्यानंतर त्यांच्या चौकशा थंडावल्या. त्यामुळे मेंदू ताब्यात घेण्याचे आणि पक्ष फोडण्याचे राजकारण कुणी केले, असा प्रतिप्रश्न विरोधक विचारत आहेत.

दुसरीकडे ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी मुख्य निवडणूक आयुक्तांवर आणखी गंभीर आरोप केला आहे. ज्ञानेश कुमार हे पंतप्रधान मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांच्या गळ्यातील हाडूक बनले आहेत. निवडणुकीत घोटाळे करून त्यांनी भाजपला विजय मिळवून दिले आहेत. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना पदावरून काढले तर अनेक गोष्टी उघड होतील, या भीतीने त्यांना सांभाळून घेतले जात आहे. भाजपने केंद्रात असलेल्या आपल्या सत्तेच्या आधारावर अशा काही युक्त्या केल्या की, ते पाहिल्यावर भल्याभल्यांची डोकी

ह.भ.प.शिवाजी विठ्ठल चौगुले.
कागल-कोल्हापूर
९८६७७३२५०४

चक्रावून जातील. काँग्रेसचे खासदार राहुल गांधी यांना प्रामुख्याने टार्गेट करताना देवेंद्र फडणवीस हे विरोधकांचा मेंदू चोरीला गेला आहे, तो शोधायला हवा, असे म्हणत आहेत. पण जेव्हा एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेत बंड केले तेव्हा तो शिवसेनेचा अंतर्गत मुद्दा आहे, मुद्दा आहे, आमचा त्याच्याशी काही संबंध नाही, असे फडणवीस म्हणाले होते, पण जेव्हा बंड यशस्वी झाले आणि भाजपची शिंदेंसोबत राज्यात सत्ता आली तेव्हा या सगळ्यामागे मुख्य सूत्रधार फडणवीस होते, असे एकनाथ शिंदे यांनी विधानसभेत सांगितले आणि फडणवीस यांनी त्यांना हसत हसत संमती दिली. भाजपकडे नरेंद्र मोदी यांच्यासारखा जादूगार आहे, त्यामुळे ते हवे ते चमत्कार करू शकतात. राहुल गांधी मागे एकदा म्हणाले होते, नरेंद्र मोदी ऐसा आदमी हैं, जो गंजे को भी कंगा बेच सकता हैं. म्हणजे मोदी डोक्यावर केस नसलेल्या माणसालाही कंगवा विकू शकतात.

राहुल गांधी यांचे हे विधान बरेच काही सांगून जाते. भाजपची मार्केटिंग स्ट्रॅटेजी खूप शक्तिशाली आहे. शेवटी आजच्या जगात मार्केटिंग हे फार महत्त्वाचे आहे, त्यातून तुम्ही लोकांना तुमच्याकडे खेचू शकता. राजकारण असो नाही तर गणपती मंडळ असो, नवसाला पावणारा असे विशेषण लावून मार्केटिंग केले तर लोक तिकडे खेचले जातात. भाजपकडे सध्या नरेंद्र मोदी नावाचे नवसाला पावणारे नेतृत्व आहे, त्यामुळे सगळ्यांचे मेंदू ते आपल्या सोयीनुसार वळवू शकतात. कारण २०२२ साली त्यांनी एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्रीपद देऊन फडणवीस यांनाही चकवा दिला होता.

# वृद्धत्व : आधाराची नव्हे, सन्मानाची गरज

**– डॉ. राजेंद्र बगाटे**

दरवर्षी १ ऑक्टोबर हा दिवस 'आंतरराष्ट्रीय वृद्ध व्यक्ती दिन' म्हणून साजरा केला जातो. वृद्ध व्यक्तींचे हक्क, आरोग्य, सुरक्षितता, आर्थिक स्वावलंबन, सामाजिक सहभाग आणि सन्मानपूर्वक जगण्याचा अधिकार यांविषयी जागरूकता निर्माण करणे हा या दिवसाचा प्रमुख उद्देश आहे. संयुक्त राष्ट्रांच्या महासभेने १४ डिसेंबर १९९० रोजी १ ऑक्टोबर हा दिवस आंतरराष्ट्रीय वृद्ध व्यक्ती दिन म्हणून घोषित केला. वाढते आयुर्मान आणि वृद्ध लोकसंख्येचे वाढते प्रमाण यामुळे वृद्धत्वाचा प्रश्न आता केवळ कुटुंबापुरता मर्यादित राहिलेला नाही; तो आरोग्य, सामाजिक सुरक्षा, अर्थव्यवस्था, निवास, मानवी हक्क आणि सार्वजनिक धोरणांशी जोडलेला व्यापक सामाजिक प्रश्न बनला आहे. त्यामुळे या दिनाचे महत्त्व वृद्ध व्यक्तींना शुभेच्छा देण्यापुरते मर्यादित न ठेवता वृद्धत्वाकडे पाहण्याच्या सामाजिक दृष्टिकोनाचा पुनर्विचार करण्यात आहे.

वृद्धत्व हा जीवनाचा नैसर्गिक टप्पा आहे; तो आजार किंवा व्यक्तीच्या उपयुक्ततेचा अंत नाही. वयानुसार शारीरिक क्षमतांमध्ये बदल होऊ शकतात, परंतु आयुष्यभराच्या अनुभवातून निर्माण झालेले ज्ञान, सामाजिक जाण, निर्णयक्षमता आणि जीवनदृष्टी ही वृद्ध व्यक्तीची मोठी संपत्ती असते. कुटुंबासाठी आयुष्यभर श्रम करणाऱ्या, मुलांचे संगोपन करणाऱ्या आणि विविध सामाजिक बदलांचे साक्षीदार असलेल्या वृद्धांच्या योगदानाकडे केवळ 'काळजी घेण्याची गरज असलेली व्यक्ती' या चौकटीत पाहणे अन्यायकारक ठरते. रोजगारातून निवृत्ती घेतल्यानंतर व्यक्तीची सामाजिक भूमिका संपत नाही. उलट, अनुभवाच्या आधारे पुढील पिढीला मार्गदर्शन करण्याची तिची क्षमता अधिक महत्त्वाची ठरू शकते.

भारतीय समाजात संयुक्त कुटुंबपद्धतीमुळे वृद्धांना कुटुंबाच्या दैनंदिन जीवनात महत्त्वाचे स्थान होते. अनेक पिढ्या एकत्र राहत असल्याने आजी-आजोबांचा नातवंडांशी संवाद, घरातील निर्णयांमध्ये सहभाग आणि परंपरांचे हस्तांतरण सहज घडत असे. मात्र, नागरीकरण, औद्योगिकीकरण, शिक्षण व रोजगारासाठी स्थलांतर आणि बदलती जीवनशैली यामुळे कुटुंबरचना बदलली आहे. लहान कुटुंबांचे प्रमाण वाढले असून तरुण पिढी शिक्षण किंवा रोजगारासाठी दूरवर स्थायिक होत आहे. त्यामुळे वृद्ध पालक आणि मुलांमध्ये भौगोलिक अंतर वाढले आहे. तंत्रज्ञानामुळे संपर्क शक्य झाला असला तरी प्रत्यक्ष सहवास, संवाद आणि भावनिक जवळीक यांची पूर्ण भरपाई तंत्रज्ञान करू शकत नाही.

यामुळे वृद्धांच्या जीवनातील एकटेपणाचा प्रश्न गंभीर होत आहे. घरात माणसे असूनही आपले म्हणणे ऐकून घेणारा कोणी नाही, निर्णयांमध्ये आपले मत विचारले जात नाही किंवा आपल्या भावनांना पुरेसा प्रतिसाद मिळत नाही, अशी अवस्था मानसिक एकाकीपणाला जन्म देऊ शकते. विशेषतः जोडीदाराच्या निधनानंतर किंवा मुलांचे स्थलांतर झाल्यानंतर ही पोकळी अधिक तीव्र होते. वृद्धांची काळजी म्हणजे केवळ अन्न, औषधे आणि निवारा देणे नव्हे; त्यांना वेळ देणे, त्यांचे म्हणणे ऐकणे, त्यांच्या आवडी-निवडींचा आदर करणे आणि कुटुंबातील त्यांचे स्थान कायम ठेवणे तितकेच आवश्यक आहे. भावनिक सहवास ही वृद्धत्वातील मूलभूत गरज आहे.

आरोग्य हा वृद्धत्वातील आणखी एक केंद्रस्थानी असलेला प्रश्न आहे. वाढत्या वयाबरोबर दृष्टी व श्रवणक्षमता कमी होणे, सांधेदुखी, हाडांची झीज, हालचालींवरील मर्यादा, रक्तदाब, मधुमेह, हृदयविकार आणि इतर दीर्घकालीन आजार उद्भवू शकतात. त्यामुळे वृद्धांसाठी आरोग्यव्यवस्था उपचारांपुरती मर्यादित न ठेवता नियमित तपासणी, प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा, पोषण, योग्य शारीरिक हालचाल, औषधांचे व्यवस्थापन आणि मानसिक आरोग्य यांचा समावेश करणारी असावी. ग्रामीण भागात प्राथमिक आरोग्यसेवा सुलभ करणे आणि आवश्यकतेनुसार तज्ज्ञ उपचारांपर्यंत पोहोच सुनिश्चित करणे विशेष महत्त्वाचे आहे. वृद्ध व्यक्तीच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करणे म्हणजे तिच्या जीवनमानाकडे दुर्लक्ष करणे होय.

शारीरिक आरोग्याबरोबरच मानसिक आरोग्याचीही काळजी आवश्यक आहे. निवृत्तीनंतरची बदललेली दिनचर्या, सामाजिक भूमिका कमी होणे, आर्थिक चिंता, जोडीदाराचा मृत्यू, मुलांपासून वाढलेले अंतर किंवा दीर्घकालीन आजार यांमुळे मानसिक ताण निर्माण होऊ शकतो. अनेक वृद्ध आपला त्रास व्यक्त न करता तो सहन करतात. 'वय झाले की असे होते' या समजुतीमुळे त्यांच्या मानसिक समस्यांकडे दुर्लक्ष केले जाते. प्रत्यक्षात संवाद, सामाजिक सहभाग, छंद, सांस्कृतिक उपक्रम आणि आवश्यकतेनुसार समुपदेशन यांमुळे वृद्धांच्या मानसिक स्वास्थ्याला आधार मिळू शकतो. मानसिक आरोग्याला शारीरिक आरोग्याइतकेच महत्त्व देणे ही काळाची गरज आहे. वृद्धत्वातील आर्थिक सुरक्षितता हा स्वाभिमानाशी संबंधित प्रश्न आहे. संघटित क्षेत्रातील निवृत्तीवेतनधारकांना नियमित उत्पन्नाचा आधार असू शकतो; परंतु असंघटित क्षेत्रात आयुष्यभर काम केलेल्या शेतमजूर, लहान शेतकरी, घरगुती कामगार, बांधकाम कामगार आणि छोट्या व्यवसायांवर अवलंबून असलेल्या व्यक्तींसाठी वृद्धापकाळातील आर्थिक स्थैर्य अधिक कठीण असते. बचतीचा अभाव, नियमित उत्पन्न नसणे आणि आरोग्यखर्चाचा वाढता भार यामुळे असुरक्षितता वाढू शकते. त्यामुळे सामाजिक सुरक्षा, निवृत्तीवेतन, आरोग्य संरक्षण आणि इतर कल्याणकारी योजनांचा लाभ पात्र वृद्धांपर्यंत सहज व वेळेवर पोहोचणे आवश्यक आहे. वृद्धांची आर्थिक सुरक्षितता ही दया नसून सामाजिक न्यायाचा विषय आहे. वृद्ध व्यक्तींवरील अत्याचार हा समाजासमोरील गंभीर प्रश्न आहे. शारीरिक हिंसेबरोबर मानसिक छळ, अपमान, दुर्लक्ष, आर्थिक शोषण, मालमत्तेवर दबाव आणणे किंवा औषधोपचार व मूलभूत गरजा नाकारणे अशा विविध स्वरूपांत अत्याचार होऊ शकतात. कुटुंबातील व्यक्तींवर अवलंबून राहण्याची परिस्थिती असल्याने अनेक वृद्ध तक्रार करण्यास घाबरतात. त्यामुळे कायदेशीर संरक्षणाबरोबरच तक्रार नोंदविण्याची सुलभ व्यवस्था, सामाजिक जागरूकता आणि गरजूंना तातडीची मदत उपलब्ध होणे आवश्यक आहे. वृद्धांच्या सन्मानाचे रक्षण करणे हे त्यांच्या मूलभूत मानवी अधिकारांचे संरक्षण करण्याशी जोडलेले आहे.

वृद्ध महिलांच्या प्रश्नांकडेही स्वतंत्रपणे पाहणे गरजेचे आहे. आयुष्यभर घर आणि कुटुंबाची जबाबदारी सांभाळलेल्या अनेक महिलांकडे स्वतंत्र आर्थिक साधने मर्यादित असतात. पतीच्या निधनानंतर त्यांची आर्थिक व सामाजिक असुरक्षितता वाढू शकते. विशेषतः ग्रामीण भागात आरोग्यसेवा, वाहतूक, बँकिंग आणि शासकीय योजनांपर्यंत पोहोचताना त्यांना अतिरिक्त अडचणी येऊ



शकतात. त्यामुळे वृद्ध महिलांना आर्थिक स्वावलंबन, सुरक्षितता, आरोग्यसेवा आणि निर्णयप्रक्रियेत सहभागाच्या संधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

ग्रामीण आणि शहरी वृद्धांचे प्रश्नही त्यांच्या परिस्थितीनुसार बदलतात. ग्रामीण भागात सामाजिक संबंध आणि शेजारधर्माचा आधार असला तरी आरोग्यसेवा, वाहतूक व आर्थिक सुविधा मर्यादित असू शकतात. शहरांमध्ये विविध सुविधा उपलब्ध असूनही वेगवान जीवनशैली, महागडे जीवनमान आणि सामाजिक तुटकपणा यांमुळे एकटेपणाची समस्या वाढू शकते. म्हणून वृद्धांसाठी एकच उपाय सर्वत्र लागू करण्याऐवजी स्थानिक गरजांनुसार सेवा विकसित करणे आवश्यक आहे. वृद्धस्नेही सार्वजनिक व्यवस्था उभारण्यासाठी सुरक्षित पदपथ, बसण्याची ठिकाणे, सुलभ वाहतूक, सार्वजनिक स्वच्छतागृहे आणि सहज उपलब्ध आरोग्यसेवा यांचा विचार केला पाहिजे.

डिजिटल युगात वृद्धांसाठी तंत्रज्ञान हे संधीचे साधनही आहे आणि आव्हानही. मोबाईल व संगणकाच्या माध्यमातून बँकिंग, शासकीय सेवा, आरोग्यविषयक माहिती आणि दूरस्थ संवाद सहज शक्य झाला आहे. मात्र डिजिटल साधनांचा पुरेसा परिचय नसल्यामुळे काही वृद्ध या सुविधांपासून दूर राहतात. त्याचवेळी बनावट दूरध्वनी, संदेश, फसवे दुवे आणि आर्थिक आमिषांद्वारे डिजिटल फसवणुकीचा धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे वृद्धांना डिजिटल साक्षर करण्याबरोबरच सुरक्षित व्यवहार, गोपनीय माहितीचे संरक्षण आणि संशयास्पद संदेशांची पडताळणी यांचेही प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. कुटुंबातील तरुणांनी वृद्धांना तंत्रज्ञानापासून दूर ठेवण्याऐवजी त्याचा सुरक्षित वापर शिकविणे ही पिढ्यांमधील सहकार्याची नवी दिशा ठरू शकते. वृद्ध व्यक्ती समाजाच्या सामूहिक स्मृतीच्या महत्त्वाच्या वाहक आहेत. स्थानिक इतिहास, पारंपरिक शेती, लोककला, बोलीभाषा, लोकपरंपरा, सामाजिक बदल आणि जीवनसंघर्ष यांचे अनुभव त्यांच्या स्मरणात जतन झालेले असतात. आधुनिकतेच्या वेगात या अनुभवांचे दस्तऐवजीकरण न झाल्यास मौल्यवान सामाजिक ज्ञान नष्ट होऊ शकते. शाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठांनी विद्यार्थ्यांना वृद्धांशी संवाद साधण्याच्या संधी उपलब्ध करून दिल्यास पिढ्यांमधील दरी कमी होईल आणि मौखिक इतिहासाचे जतनही करता येईल. वृद्धांच्या अनुभवाकडे भूतकाळातील आठवणी म्हणून नव्हे, तर वर्तमानाला दिशा देणाऱ्या सामाजिक संपत्ती म्हणून पाहण्याची गरज आहे. वृद्धत्व म्हणजे निष्क्रियता असा समजही बदलला पाहिजे. आपल्या क्षमता आणि इच्छेनुसार वृद्धांना सामाजिक उपक्रम, वाचन, लेखन, कला, संगीत, बागकाम, मार्गदर्शन, सामाजिक सेवा किंवा अनुभवाधारित कार्यात सहभागी होता येते. काही वृद्धांना निवृत्तीनंतरही काम करण्याची इच्छा असते; त्यांच्या आरोग्याचा आणि क्षमतेचा विचार करून सन्मानजनक संधी उपलब्ध करून देता येतात. यामुळे आत्मविश्वास वाढतो आणि समाजालाही त्यांच्या अनुभवाचा लाभ मिळतो. वृद्धांना केवळ मदतीचे लाभार्थी न मानता सामाजिक सहभागाचे अधिकार असलेले नागरिक म्हणून स्वीकारणे आवश्यक आहे.

वृद्धांच्या प्रश्नांवर शासन आणि कुटुंबाबरोबरच स्थानिक स्वराज्य संस्था, आरोग्यव्यवस्था, शैक्षणिक संस्था आणि सामाजिक संघटनांनीही काम करणे गरजेचे आहे. सामाजिक सुरक्षा योजनांचा प्रभावी लाभ, आरोग्यसेवा, सुरक्षित निवास, सार्वजनिक सुविधांची सुलभता, समुपदेशन आणि सामाजिक संवादाची साधने उपलब्ध झाली तर वृद्धांचे जीवन अधिक सुरक्षित होऊ शकते. मात्र धोरणे आणि योजना कितीही चांगल्या असल्या तरी त्यांची परिणामकारकता प्रत्यक्ष अंमलबजावणीवर अवलंबून असते. वृद्ध व्यक्तीला कार्यालये, रुग्णालये किंवा शासकीय यंत्रणांमध्ये सन्मानाने वागणूक मिळणे हीदेखील कल्याणाचीच बाब आहे.

या सर्व प्रक्रियेत कुटुंबाची भूमिका सर्वाधिक जवळची आणि प्रभावी आहे. वृद्ध आई-वडिलांना आर्थिक मदत करणे पुरेसे नाही; त्यांच्याशी संवाद साधणे, त्यांच्या निर्णयस्वातंत्र्याचा आदर करणे, आरोग्याची काळजी घेणे आणि त्यांना कौटुंबिक जीवनात सहभागी करून घेणे आवश्यक आहे. वृद्ध व्यक्तीला 'तुमचे वय झाले' असे वारंवार जाणवून देण्यापेक्षा 'तुमचा अनुभव आमच्यासाठी महत्त्वाचा आहे' ही भावना देणे अधिक मोलाचे आहे. पिढ्यांमधील संवाद वाढला तर वृद्धांच्या मानसिक गरजा पूर्ण होण्याबरोबरच तरुण पिढीलाही जीवनातील अनुभव आणि मूल्यांची समृद्ध जाण मिळू शकते.

आज वृद्धत्वाचा प्रश्न लोकसंख्येतील बदलाशीही जोडला गेला आहे. आयुर्मान वाढत असताना वृद्ध व्यक्तींची संख्या वाढत आहे. त्यामुळे भविष्यातील समाजरचनेत आरोग्य, सामाजिक सुरक्षा, निवास, दीर्घकालीन काळजी, आर्थिक स्थैर्य आणि सामाजिक सहभाग यांचे नियोजन करणे आवश्यक ठरणार आहे. अधिक वर्षे जगणे ही मानवी प्रगतीची उपलब्धी आहे; परंतु त्या वर्षांना आरोग्य, स्वायत्तता, सुरक्षितता आणि प्रतिष्ठेची जोड मिळाली तरच दीर्घायुष्य अर्थपूर्ण ठरते. वृद्ध लोकसंख्या ही केवळ आव्हान नसून अनुभव, कौशल्य आणि सामाजिक स्मृतीचा मोठा स्रोतही आहे.

१ ऑक्टोबरचा आंतरराष्ट्रीय वृद्ध व्यक्ती दिन म्हणूनच एका दिवसाच्या औपचारिक कार्यक्रमापुरता मर्यादित राहू नये. आपल्या घरातील वृद्ध व्यक्तीशी आपण किती संवाद साधतो, तिचे मत किती ऐकतो, तिच्या आरोग्याची किती काळजी घेतो आणि तिच्या अनुभवाला किती स्थान देतो, याचा विचार या निमित्ताने झाला पाहिजे. वृद्धांना दयेची नव्हे, तर सन्मानाची गरज आहे; केवळ संरक्षणाची नव्हे, तर स्वायत्ततेची गरज आहे; केवळ सहानुभूतीची नव्हे, तर सामाजिक सहभागाची संधी आवश्यक आहे. वृद्धत्वाकडे ओझे म्हणून पाहणारी मानसिकता बदलून अनुभवसंपन्न जीवनाचा परिपक्व टप्पा म्हणून त्याचा स्वीकार करणे ही अधिक संवेदनशील समाजाची खूण आहे.

वास्तविक पाहता वृद्ध व्यक्तींचा सन्मान हा एका पिढीपुरता प्रश्न नाही. ज्यांनी कुटुंब आणि समाजाच्या उभारणीत आयुष्य घालविले, त्यांच्या जीवनाच्या उत्तरार्धात सुरक्षितता, आपलेपणा आणि प्रतिष्ठा मिळणे ही सामूहिक जबाबदारी आहे. वृद्धत्वाला दुर्बलतेशी जोडण्याऐवजी अनुभव, ज्ञान आणि सामाजिक योगदानाशी जोडले पाहिजे. कारण वृद्ध व्यक्तींच्या आयुष्यात केवळ गेलेल्या काळाच्या आठवणी नसतात, तर पुढील पिढ्यांना दिशा देणारे अनुभवही असतात. म्हणूनच वृद्धत्वाचा सन्मान म्हणजे अनुभवाचा सन्मान आणि अनुभवाचा सन्मान म्हणजे माणुसकीचा सन्मान होय.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## थोडक्यात बातम्या

## मनसेच्या पाठपुराव्याला यश; ३ वर्षांनंतर खिडकाळी येथील ठामपा शाळा क्र.८९ ला मिळाले पिण्याच्या पाण्याचे कनेक्शन



**अक्षराज : विनोद वास्कर**
दि.२९, दिवा (ठाणे) : खिडकाळी येथील ठाणे महानगरपालिका शाळा क्रमांक ८९ मध्ये गेल्या तीन वर्षांपासून विद्यार्थ्यांना पिण्याच्या पाण्याची जोडणी देण्यात आली नव्हती. त्यामुळे चिमुकल्यांना गेल्या ३ वर्षांपासून बोअरवेलच्या पाण्यावरच तहान भागवावी लागत होती.

या गंभीर प्रश्नाबाबत १२ ऑगस्ट २०२६ रोजी संबंधित अधिकाऱ्यांना निवेदन देऊनही कोणतीही कार्यवाही झाली नाही. अखेर आज मनसेने आक्रमक भूमिका घेतली.

मनसेचे जिल्हा संघटक तुषार पाटील, विधानसभा सचिव शरद पाटील, शहर अध्यक्ष प्रशांत गावडे यांच्या नेतृत्वाखाली ठाणे महापालिका मुख्यालय येथे कार्यकारी अभियंता भगवान शिंदे आणि शिक्षण अधिकारी ओमकार बजागे यांची भेट घेऊन या विषयाचे गांभीर्य निदर्शनास आणून देण्यात आले.

मनसेच्या या आक्रमक पवित्र्यानंतर कार्यकारी अभियंता भगवान शिंदे यांनी तात्काळ आजच शाळेला पाणी पुरवठा करण्यासाठी नळ जोडणी करून देण्याचे आश्वासन दिले. त्यानुसार तीन वर्षांच्या प्रतीक्षेनंतर अखेर ठाणे महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागाने टॅप मारून नळ जोडणी करून दिली. अंधार पडल्याने शाळेपर्यंत पाईप टाकण्याचे काम उद्या सकाळी पूर्ण करण्यात येणार आहे. यावेळी मनसेचे विभाग अध्यक्ष जयेश घरत, विभाग अध्यक्ष शैलेंद्र कदम तसेच शाखाध्यक्ष सचिन चव्हाण उपस्थित होते.

## टाकळी ढोकेश्वर परिसरात विद्युत मोटार व केबल चोरट्यांचा धुमाकूळ

**ढोकी तलावावरून मोटारींच्या केबल लंपास...**

**पंधरा शेतकऱ्यांचा चार लाखांचा मुद्देमाल...**



**अक्षराज : वसंत रांधवण**
दि.२९, पारनेर (अहिल्यानगर) : एकीकडे पावसाने पाठ फिरवल्याने शेतकरी संकटात सापडले असताना, दुसरीकडे तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर परिसरातील शेतकऱ्यांच्या विद्युत मोटारी व केबल चोरट्यांचा धुमाकूळ सुरू झाला आहे.

ढोकी तलावावरून शेतीसाठी पाणी उपसा करणाऱ्या शेतकऱ्यांच्या मोटारीच्या तब्बल १५ सर्व्हिस केबल अज्ञात चोरट्यांनी लंपास केल्या. २८ सप्टेंबर रोजी रात्री ११ ते २९ सप्टेंबर रोजी पहाटे या कालावधीत ही चोरी झाली. या घटनेत सुमारे चार लाखांहून अधिक रकमेच्या केबली चोरीस गेल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले. त्यामुळे शेतकर्यांमध्ये भिती निर्माण झाली आहे. तर काही शेतकऱ्यांच्या शेतातील व टाकळी ढोकेश्वर ग्रामपंचायत पाणीपुरवठा करणाऱ्या विहिरीवर असणार्या इलेक्ट्रिक मोटारीच्या केबल चोरीला जात असल्याच्या घटना घडलेल्या आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार ढोकी तलावावरून शेतीसाठी पाणी उपसा करण्यासाठी मोठ्या क्षमतेच्या विद्युत मोटारी बसवण्यात आल्या आहेत. या मोटारींना जोडणारी मुख्य तांब्याची (कॉपर) केबल रात्रीच्या अंधाराचा फायदा घेऊन चोरट्यांनी कटरच्या सहाय्याने कापून नेल्या आहेत. नेहमीप्रमाणे सकाळी तेथील स्थानिक राखणदार तलावाच्या मोटारींकडे पहाणी करण्यासाठी आले असता, दोन मोटारीची केबल गायब झालेली दिसून आली, त्यांनी पहाणी केली असता त्यांना मोटारींच्या केबली गायब असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. या अगोदरही या परिसरातील अनेक शेतकऱ्यांच्या मोटारींच्या इलेक्ट्रिक केबल चोरीला गेल्याच्या घटना घडलेल्या आहेत. याबाबत मात्र, शेतकरी कोणत्याही प्रकारचा गाजावाजा न करता किंवा या होणाऱ्या चोरीबद्दल पोलिस स्टेशनला तक्रारी करण्याचे टाळत नाहीत. कारण तक्रार करूनही चोरीचा तपास लागत नसल्यामुळे कोणीही तक्रार देण्यास तयार नाही, असे या भागातील शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

अशा होणाऱ्या या चोऱ्यांमुळे सध्या तरी शेतकरी हतबल झाल्याचे चित्र या भागात पाहावयास मिळत आहे. या केबल चोरांचा तपास पोलीसांनी लावावा, अशी मागणी या भागातील शेतकऱ्यांनी केली आहे.

**तलावाजवळील जलवाहिनीची वीज केबल चोरीला**

ढोकी तलावाजवळील टाकळी ढोकेश्वर गावाला पाणीपुरवठा करणाऱ्या विहिरीवर पाणी उपसा करण्यासाठी बसवण्यात आलेल्या विद्युत पंपाची लाखो रुपये किमतीची वीज केबल अज्ञात चोरट्यांनी कापून चोरून नेल्याची धक्कादायक घटना पंधरा दिवसांपूर्वी घडली असून त्या चोरीचा तपास अजूनही लागला नाही. गेल्या महिनाभरात अशा अनेक शेतकऱ्यांच्या विद्युत मोटारी व केबल चोरीला गेल्याने शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. चोरीच्या घटनांना आळा घालून चोरट्यांचा कायमस्वरूपी बंदोबस्त करावा. पोलीसांनी शेतकऱ्यांना याबाबत दिलासा दिला पाहिजे.

## आंतरमहाविद्यालयीन क्रीडा स्पर्धेत वैष्णवी कुरे प्रथम



**अक्षराज : बालासाहेब फुलपगार**
दि.२९, पालम (परभणी) : शहरातील माधवराव पाटील महाविद्यालयाची विद्यार्थिनी वैष्णवी सोपानराव कुरे हिने स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठांतर्गत आयोजित आंतरमहाविद्यालयीन क्रीडा स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करत १५०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला आहे. तसेच ५००० मीटर धावण्याच्या स्पर्धेत तिने तृतीय क्रमांक मिळविला. श्री शिवाजी महाविद्यालय, परभणी येथे पार पडलेल्या या आंतरमहाविद्यालयीन क्रीडा स्पर्धेत वैष्णवीने आपल्या उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर हे यश संपादन केले. तिच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे महादेवराव पाटील महाविद्यालयाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे.

वैष्णवी कुरेच्या या यशाबद्दल श्री बळीराजा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष तुषार भैय्या गोळेगावकर, संस्थेचे सचिव डॉ.संतराम एलमोटे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आत्माराम आरसुळे तसेच प्रा.डॉ.एच.टी. सातपुते, प्रा.डॉ.शिवाजीराव पौळ, प्रा.डॉ.उद्धव निर्वळ, प्रा.डॉ.गोवर्धन उरकुडे यांच्यासह महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांनी तिचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

## रुद्रांश पाटीलच्या नेत्रदीपक कामगिरीने ठाण्याच्या शिरपेचात मानाचा तुरा



**अक्षराज : विकास दळवी**
दि.२९, ठाणे : आशियाई क्रीडा स्पर्धेतील नेमबाजीमध्ये उल्लेखनीय कामगिरी करत ठाण्याचे नाव देशाच्या क्रीडा क्षेत्रात उंचावणाऱ्या रुद्रांश हेमांगीनी बाळासाहेब पाटील यांचे ठाणे महापालिकेच्या वतीने विशेष अभिनंदन करण्यात आले. धर्मवीर आनंद दिघे ठाणे प्रवेशद्वार, आनंदनगर येथे झालेल्या कार्यक्रमात महापौर शर्मिला पिंपळेकर यांनी रुद्रांश यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

आशियाई क्रीडा स्पर्धेतील पुरुषांच्या १० मीटर एअर रायफल सांघिक स्पर्धेत रुद्रांश पाटील यांनी हिमांशू दिल्लों आणि पार्थ माने यांच्या साथीने भारताला रौप्यपदक मिळवून दिले. त्यानंतर वैयक्तिक स्पर्धेतही त्यांनी कांस्यपदक पटकावत आपल्या कामगिरीत आणखी एक मानाचा तुरा खोवला.

रुद्रांश यांच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे ठाण्याच्या क्रीडा क्षेत्राची देश-विदेशात पुन्हा एकदा दखल घेतली गेली आहे. यापूर्वीही रुद्रांश यांनी जागतिक पातळीवरील आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. २०२२ च्या जागतिक अजिंक्यपद नेमबाजी स्पर्धेतील १० मीटर एअर रायफल प्रकारात त्यांनी वैयक्तिक सुवर्णपदक पटकावले होते.

यावेळी महापौर शर्मिला पिंपळेकर यांनी रुद्रांश यांचे कौतुक करत त्यांच्या यशाबद्दल अभिमान व्यक्त केला. रुद्रांशने आपल्या अचूक नेमबाजीने ठाण्याचे तसेच देशाचे नाव उज्वल केले आहे, असे त्यांनी नमूद केले. त्यांच्या पुढील वाटचालीसाठी महापौरांनी शुभेच्छा दिल्या.

रुद्रांश यांच्या स्वागतासाठी आमदार रविंद्र फाटक, महापौर शर्मिला पिंपळेकर, नगरसेवक विकास रेपाळे, योगेश जानकर, नगरसेविका नम्रता भोसले, उपायुक्त क्रीडा मीनल पाळंडे, अभियंते मंगेश देसाई यांच्यासह महापालिकेचे अधिकारी-कर्मचारी, पोलीस विभागातील अधिकारी तसेच ठाणेकर नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

रुद्रांश पाटील यांच्या यशामुळे ठाण्यातील युवा खेळाडूंना निश्चितच प्रेरणा मिळणार असून, त्यांच्या पुढील आंतरराष्ट्रीय कारकिर्दीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## श्री साईबाबा बहुउद्देशीय नागरीक सहकारी पतसंस्थेची ३२वी वार्षिक सर्वसाधारण संपन्न



**अक्षराज : दिवाकर घेर**
दि.२९, नागपूर : श्री साईबाबा बहुउद्देशीय नागरीक सहकारी पतसंस्था मर्या., खापरखेडा या संस्थेची ३२वी वार्षिक सर्वसाधारण सभा २७ सप्टेंबर २०२६ रोजी श्री साई सेलिब्रेशन हॉल, पारशिवनी येथे पार पडली.

सभेच्या अध्यक्षस्थानी जिल्हा पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष राजेंद्र घाटे तर प्रमुख अतिथी म्हणून लक्ष्मीकांत पांडे उपस्थित होते. संस्थेचे अध्यक्ष मोरेश्वर मंगुलकर यांच्यासह सर्व संचालक मंडळ, सभासद व मान्यवर उपस्थित होते.

संस्थेचे अध्यक्ष मोरेश्वर मांगुळकर यांनी संस्थेचा वार्षिक अहवाल सादर केला. आर्थिक वर्षात संस्थेला ५८ लाख रुपयांचा नफा झाला असून, संस्थेने आपल्या प्रगतीची यशस्वी वाटचाल कायम ठेवली आहे.

संस्थेच्या प्रगतीमध्ये सभासद, ठेवीदार व हितचिंतकांनी ठेवलेल्या विश्वासाबद्दल यावेळी आभार व्यक्त करण्यात आले. संस्थेच्या पुढील वाटचालीसाठी सर्वांचे सहकार्य असेच कायम राहावे, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

कार्यक्रमाचे संचालन मंगेश लांडे यांनी केले तर आभार संस्थेचे कार्यकारी अधिकारी अभिनव मांगुळकर यांनी मानले.

## सीआरएस प्रणालीच्या नावाखाली जन्म-मृत्यू प्रमाणपत्रांसाठी नागरिकांची अडवणूक

सीआरएस पोर्टलवर जन्म-मृत्यूची नोंद वेळेत केली जाते. मात्र, नागपूर जिल्हा परिषद आरोग्य विभागाकडून त्याला मंजुरी मिळण्यासाठी जवळपास एका महिन्याचा अवधी लागतो, यासंदर्भात ग्रामपंचायतीच्या मासिक सभेत ठराव घेण्यात आला असून नागरिकांना दाखले त्वरित उपलब्ध व्हावेत यासाठी आम्ही पाठपुरावा करत आहोत.

**– पंकज दांगट**
**ग्रामपंचायत अधिकारी, चिचोली**

**अक्षराज : दिवाकर घेर**
दि.२९, नागपूर : शासकीय नियमांची सक्ती केवळ सामान्य जनतेवरच आहे का? प्रशासकीय दिरंगाईला जबाबदार कोण?असा संतप्त सवाल सध्या चिचोली व वलनी जिल्हा परिषद सर्कल परिसरातील नागरिक उपस्थित करत आहेत.

केंद्र शासनाच्या सीआरएस प्रणालीतील तांत्रिक अडचणी व मंजुरीचे कारण पुढे करत स्थानिक नागरिकांना जन्म आणि मृत्यूच्या प्रमाणपत्रांसाठी अनेक महिने कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागत असून यामुळे जनसामान्यांमध्ये तीव्र रोष पसरला आहे. शासनाच्या नियमांनुसार नागरिकांनी जन्म किंवा मृत्यूची नोंद २१ दिवसांच्या आत न केल्यास त्यांना उशिरा नोंदणीचा दंड भरावा लागतो, शिवाय प्रतिज्ञापत्र व इतर कागदपत्रांची पूर्तता करावी लागते. मात्र, जनतेकडून नियमांचे काटेकोर पालन करून घेणारा नागपूर जिल्हा परिषदेचा आरोग्य विभाग स्वतःची जबाबदारी पार पाडण्यात सपशेल अपयशी ठरत आहे.

चिचोली व वलनी सर्कल अंतर्गत येणाऱ्या ग्रामपंचायतींमध्ये दाखल्यांसाठी अर्ज केल्यानंतर जिल्हा परिषद आरोग्य विभागाकडून ऑनलाइन मंजुरी मिळाल्याशिवाय दाखला मिळणार नाही असे उत्तर देऊन टाळाटाळ केली जात आहे. जन्म-मृत्यूचे दाखले वेळेत न मिळाल्याने नागरिकांचे जीवन अक्षरशः विस्कळीत झाले असून मृत व्यक्तीच्या वारसांना एलआयसी व इतर कंपन्यांचे विमा दावे मिळणे कठीण झाले आहे.

याशिवाय वारस हक्क नोंदी, बँक खात्यांचे व्यवहार आणि पाल्यांचे शाळा महाविद्यालयांतील प्रवेश वेळेत दाखला सादर न करू शकल्याने अडकून पडले आहेत.

महाराष्ट्र लोकसेवा हक्क कायदा २०१५ नुसार प्रत्येक नागरिकाला विहित मुदतीत दाखला मिळणे हा त्याचा कायदेशीर अधिकार आहे असे असताना दाखले नाकारणे अथवा जाणीवपूर्वक दिरंगाई करणे हा कायद्याचा थेट अवमान मानला जात आहे.

नागरिकांच्या विलंबावर तत्परतेने दंड आकारणारे प्रशासन स्वतःच्या निष्काळजीपणासाठी जबाबदार अधिकाऱ्यांवर काय कारवाई करणार? असा रोखठोक सवाल नागरिक विचारत आहेत.या दिरंगाईविरोधात चिचोली ग्रामपंचायत प्रशासनाला लेखी निवेदन सादर करण्यात आले आहे.

एका आठवड्याच्या आत सीआरएस प्रणालीतील त्रुटी दूर करून प्रलंबित जन्म-मृत्यू दाखले त्वरित वितरित करण्यात यावेत अन्यथा महाराष्ट्र सेवा हक्क कायद्यांतर्गत दोषी अधिकाऱ्यांवर वैयक्तिक दंड व कायदेशीर कारवाईसाठी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नागपूर यांच्याकडे दाद मागू असा इशारा चिचोली ग्रामपंचायत सदस्या श्वेता पारवे यांनी दिला असून मागण्या मान्य न झाल्यास तीव्र जनआंदोलन छेडले जाईल असेही त्यांनी ठणकावून सांगितले.

## के.रामलू शाळेची अक्षरा नीलपवार कुस्ती स्पर्धेत जिल्ह्यात प्रथम



**अक्षराज : दत्ता हमंद**
दि.२९, कुंडलवाडी : जिल्हा क्रीडा संकुल, नांदेड येथे आयोजित करण्यात आलेल्या शालेय जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेत के. रामलू पब्लिक स्कूल, कुंडलवाडीच्या विद्यार्थिनीने उल्लेखनीय कामगिरी करत शाळेच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला आहे.

६५ किलो वजन गटात अक्षरा शंकर नीलपवार हिने दमदार कामगिरी करत जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला. विशेष म्हणजे, अक्षराने सलग दुसऱ्यांदा जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवत विभागीय स्तरावरील स्पर्धेसाठी आपली निवड निश्चित केली आहे.

अक्षराच्या या उल्लेखनीय यशामुळे शाळेच्या क्रीडा क्षेत्रातील कामगिरीत आणखी भर पडली असून, तिच्या यशाबद्दल शाळेचे संस्थापक अध्यक्ष सायरेड्डी ठक्कूरवार, सचिव यशवंत संगमवार, संचालिका रमा ठक्कूरवार, प्रिन्सिपल संभाजी जाधव व व्हाईस प्रिन्सिपल सपना म्हैसेवाड यांनी अक्षराचे अभिनंदन केले. तसेच तिचे मार्गदर्शक क्रीडा शिक्षक रमेश कासलोड, अर्चना नरोड तसेच सहशिक्षक कामाजी तुकडेकर यांचेही अभिनंदन करण्यात आले. विभागीय स्तरावरील स्पर्धेसाठी अक्षराला सर्वांनी शुभेच्छा दिल्या असून, आगामी स्पर्धेतही ती उत्तम कामगिरी करेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

## चारठाणा उर्दू शाळेला पदवीधर शिक्षकाची नियुक्ती



**अक्षराज : अलीम शेख**
दि.२९, चारठाणा : जिल्हा परिषद उर्दू प्राथमिक शाळा, चारठाणा येथील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, यासाठी पंचायत समिती सदस्य तहेसीन जाफर मिया देशमुख यांनी गेल्या अनेक दिवसांपासून सातत्याने पाठपुरावा केला.

त्यांच्या प्रयत्नांना अखेर यश आले असून, २९ सप्टेंबर २०२६ रोजी गटशिक्षणाधिकारी यांच्या आदेशानुसार मोहम्मद गौस अब्दुल जलील, प्राथमिक पदवीधर यांची अध्यापन व्यवस्थेसाठी नियुक्ती करण्यात आली आहे.

नियुक्तीनंतर मोहम्मद गौस अब्दुल जलील हे आजच जिल्हा परिषद उर्दू प्राथमिक शाळा, चारठाणा येथे रुजू झाले. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक अडचणी दूर होण्यास मदत होणार असून, नियमित अध्यापनाला गती मिळणार आहे.

नवनियुक्त शिक्षक मोहम्मद गौस अब्दुल जलील यांचे पंचायत समिती सदस्य तहेसीन देशमुख तसेच केंद्रप्रमुख वाघमारे सर यांच्या हस्ते शाल व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी शाळेच्या वतीनेही त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

शाळेत शिक्षकाची नियुक्ती व्हावी आणि विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टळावे, यासाठी पालकांनीही सातत्याने मागणी केली होती. या मागणीची दखल घेत तहेसीन देशमुख यांनी संबंधित शिक्षण विभागाकडे पाठपुरावा करून शिक्षक उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न केले.

नवीन शिक्षक रुजू झाल्यामुळे विद्यार्थ्यांना नियमित व गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळण्यास हातभार लागणार आहे. तसेच उर्दू माध्यमातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणात सातत्य राहण्यास मदत होणार असल्याने पालकांमध्येही समाधानाचे वातावरण आहे.

यावेळी मुख्याध्यापक रोडगे सर, जुबेर अन्सारी सर यांच्यासह पालक सय्यद इलियास, ताहेर पठाण, गेंदेखा पठाण, सय्यद असगर, तय्यब पठाण, सय्यद जिलानी, अनवर पठाण, नाजेर पठाण, सनीम देशमुख आदी उपस्थित होते.

शाळेच्या शैक्षणिक गरजा लक्षात घेऊन भविष्यातही आवश्यक त्या सुविधा व शिक्षक उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले. नवीन शिक्षकाच्या नियुक्तीमुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला निश्चितच चालना मिळणार असल्याने पालकांनी समाधान व्यक्त केले.

# विकासाच्या बाबतीत महाराष्ट्र देशासाठी आदर्श निर्माण करेल - मुख्यमंत्री फडणवीस

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२९, मुंबई :** महाराष्ट्राला सर्वच क्षेत्रात प्रथम क्रमांकावर नेण्यासाठी राज्य शासन सातत्याने प्रयत्न करीत आहे. शासन यंत्रणेची क्षमता बळकट करणे, उपलब्ध संसाधनांचा योग्य वापर करणे आणि योजनांच्या परिणामांचे प्रभावी म ूल्यमापन यावर भर दिला जात आहे. या प्रयत्नांतून महाराष्ट्र विकसित राज्य म्हणून देशासाठी आदर्श निर्माण करेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.



सह्याद्री अतिथीगृह येथे 'भारताच्या विकासाला गती देणे : प्रभावी शासनासाठी राज्य-केंद्रित कृती आराखडा' या विषयावर प्रा. कार्तिक मुरलीधरन यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. यावेळी वित्त राज्यमंत्री आशिष जयस्वाल, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव विकासचंद्र रस्तोगी, महाराष्ट्र शाश्वत सार्वजनिक वित्त समितीचे अध्यक्ष विजय केळकर, समितीचे सदस्य प्रा. कार्तिक मुरलीधरन तसेच सर्व अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव आणि सचिव उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, उपलब्ध साधनसंपत्तीतून अपेक्षित परिणाम साधणे हे राज्यापुढील प्रमुख आव्हान आहे. त्यासाठी प्रशासकीय यंत्रणेची क्षमता वाढविण्यावर शासनाने भर दिला आहे. गेल्या वर्षभरापेक्षा अधिक काळापासून शासनाने १०० दिवस आणि १५० दिवसांच्या उद्दिष्टाधारित कार्यक्रम ांची यशस्वी अंमलबजावणी केली आहे. या कालबद्ध कार्यक्रमांमध्येही क्षमता वृद्धीला प्राधान्य दिले आहे.

विकसित महाराष्ट्राचा हा दीर्घकालीन प्रवास असून, त्यासाठी शासनाचे सातत्यपूर्ण आणि केंद्रित प्रयत्न सुरू आहेत. महाराष्ट्र लवकरच विकासाच्या बाबतीत देशात आघाडी घेऊन आदर्श निर्माण करेल.

व्याख्यानात मांडलेल्या संकल्पना आणि पुस्तकातील विचारांची अंम लबजावणी करण्यासाठी राज्य शासन सकारात्मकपणे काम करेल. संबंधित तज्ज्ञ आणि नव्याने गठित केलेल्या पथकाच्या सहकार्याने शासन अधिक प्रभावीपणे काम करेल, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले.

शिक्षण, आरोग्य, पोषण, सार्वजनिक सुरक्षा, न्याय, सामाजिक संरक्षण आणि रोजगार या क्षेत्रांतील सार्वजनिक सेवा नागरिकांपर्यंत अधिक प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी राज्यस्तरीय सुधारणा, प्रशासकीय क्षमता वृद्धी आणि पुराव्यावर आधारित धोरणांच्या अंमलबजावणीवर पुस्तकात भर देण्यात आला आहे. संशोधन आणि प्रत्यक्ष अनुभवांच्या आधारे शासनव्यवस्था अधिक परिणाम कारक करण्यासाठी त्यात व्यवहार्य उपाय सुचविण्यात आले आहेत.

# जनता नागरी सहकारी पतसंस्थेची २९ वी वार्षिक सभा खेळीमेळीत संपन्न

**अक्षराज : रियाज मुजावर**

**दि.२९, महाबळेश्वर (सातारा) :** महाबळेश्वर जनता नागरी सहकारी पतसंस्थेची २९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार, दि. २६ सप्टेंबर २०२६ रोजी हॉटेल अल्बा येथे खेळीमेळीच्या व उत्साही वातावरणात संपन्न झाली.

संस्थेचे चेअरमन आसिफ मानकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सभेस संचालक मंडळ, अधिकारी, कर्मचारी तसेच मोठ्या संख्येने सभासद उपस्थित होते. सभेच्या प्रारंभी संस्थेच्या संचालिका फैमिदानाझ वलगे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. डॉ. सलीम मानकर यांनी प्रास्ताविक केले, तर दिवंगत व्यक्तींना मुक्तार बागवान यांनी श्रद्धांजली वाहिली.

सभेची नोटीस वाचन व्यवस्थापक आरिफ शारवान यांनी तसेच मागील सभेचे इतिवृत्त राजू नालबंद यांनी वाचून दाखविले. संस्थेचा वार्षिक अहवाल चेअरमन आसिफ मानकर यांनी सादर केला. अंदाजपत्रकाचे वाचन संजय साळुंखे यांनी केले, तर वैधानिक लेखापरीक्षण अहवालाचे वाचन रियाज डांगे यांनी केले.

**संस्थेची आर्थिक स्थिती भक्कम**

आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये संस्थेची सभासद संख्या १,५०९ झाली असून भागभांडवल १८२.०१ लाख रुपये, राखीव व इतर निधी ५०७.०७ लाख रुपये, ठेवी २,२६१.३४ लाख रुपये, गुंतवणूक १,०५७.६१ लाख रुपये, खेळते भांडवल ३,२४४.६७ लाख रुपये, तर संस्थेला ३०.२४ लाख रुपयांचा निव्वळ नफा झाल्याची माहिती सभेत देण्यात आली

विशेष म्हणजे, संस्थेने गेल्या २९ वर्षांपासून सातत्याने 'अ' वर्ग कायम राखला असून, ही संस्थेच्या आर्थिक शिस्तीची व सभासदांच्या विश्वासाची पावती असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.



**कर्जवसुलीसाठी सभासदांना सहकार्याचे आवाहन**

संस्थेचे चेअरमन आसिफ मानकर यांनी संस्थेच्या थकबाकी तसेच एनपीए कर्जाच्या वसुलीला प्राधान्य देण्यात येत असल्याचे सांगितले. संस्थेची आर्थिक प्रगती अधिक मजबूत करण्यासाठी सभासदांनी थकीत कर्जाच्या वसुलीसाठी संस्थेला सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले.

सभेचा समारोप व आभार प्रदर्शन संचालक नसीम पन्हाळकर यांनी केले. यावेळी संचालक अकबर शारवान, राजमोहमद पन्हाळकर, संचालिका यास्मिन सय्यद, अर्बन बँकेचे मुख्य व्यवस्थापक फकीरभाई वलगे, रियाज सय्यद, आनंद बन्से, जमालुद्दीन नालबंद, अफजल वलगे, रफिक डांगे, केतन बगाडे यांच्यासह संस्थेचे पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी, सभासद व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दैनिक अक्षराजचे पत्रकार साहेबराव परबत यांना 'आदर्श पत्रकार कला साहित्य गौरव पुरस्कार'ने सन्मानित

## १०० व्या राज्यस्तरीय पुणे मराठी काव्य संमेलनात मानाचा गौरव; डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२९, पुणे :** पत्रकारिता आणि साहित्य क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणारे दैनिक अक्षराजचे पत्रकार साहेबराव परबत यांना 'आदर्श पत्रकार कला साहित्य गौरव पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले. रानकवी प्रतिष्ठान, महाराष्ट्र राज्य व ज्ञानाई फाऊंडेशन यांच्या वतीने आयोजित १०० व्या राज्यस्तरीय पुणे मराठी काव्य संम ेलनात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

हडपसर येथील महात्मा फुले सांस्कृतिक भवन येथे झालेल्या या कार्यक्रमात ८९ व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे अध्यक्ष तथा ज्येष्ठ साहित्यिक डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते साहेबराव परबत यांनी पुरस्कार स्वीकारला.

साहेबराव परबत हे गेल्या काही वर्षांपासून पत्रकारिता क्षेत्रात सक्रिय असून सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक तसेच जनसामान्यांच्या विविध प्रश्नांना आपल्या लेखणीच्या माध्यमातून सातत्याने वाचा फोडत आहेत. पत्रकारितेसोबतच साहित्य आणि काव्य क्षेत्रातही त्यांनी आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे.



वर्तमानपत्राच्या माध्यमातून समाजातील विविध घटकांचे प्रश्न, सामाजिक उपक्रम, लोकहिताचे विषय तसेच सकारात्मक कार्य समाजापर्यंत पोहोचविण्याचे काम ते सातत्याने करीत आहेत. त्यांच्या पत्रकारिता आणि साहित्य क्षेत्रातील योगदानाची दखल घेत त्यांना हा गौरव प्रदान करण्यात आला. या पुरस्कारामुळे पत्रकारिता आणि साहित्य क्षेत्रात कार्य करण्याची नवी प्रेरणा मिळाली असून, आगामी काळातही समाजहिताच्या विषयांना आपल्या लेखणीच्या माध्यमातून प्रभावीपणे मांडत राहण्याचा निर्धार साहेबराव परबत यांनी व्यक्त केला. या सन्मानाबद्दल दैनिक अक्षराज परिवार, पत्रकारिता व साहित्य क्षेत्रातील सहकारी, मित्रपरिवार तसेच विविध स्तरातून साहेबराव परबत यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# दुष्काळ निवारण उपाययोजने संदर्भात जिल्हाधिकाऱ्यांकडून आढावा विवध यंत्रणांना निर्देश

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२९, चंद्रपूर :** चंद्रपूर जिल्ह्यातील १५ पैकी १२ तालुक्यात दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. दुष्काळाच्या या पार्श्वभुमीवर विविध उपाययोजना करण्यासंदर्भात जिल्हाधिकारी वसुमना पंत यांनी दि.२९ सप्टेंबर विविध विभागांची आढावा बैठक घेऊन निर्देश दिले. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंह उपस्थित होते.राज्य शासनाने दुष्काळग्रस्त भागासाठी विशेष बाब म्हणून १२ प्रकारच्या उपाययोजना व सवलती लागू करण्याचा निर्णय घेतला आहे, असे सांगून जिल्हाधिकारी पंत म्हणाल्या, जमीन महसुलात सुट अंतर्गत प्रत्येक तालुकानिहाय किती सूट द्यायची आहे, ते त्वरीत कळवावे. पीक कर्जाचे पुनर्गठन अंतर्गत जिल्ह्यातील आतापर्यंत किती शेतक-यांना कर्जवाटप करण्यात आले, किती शेतक-यांची कर्जमाफी झाली, किती जणांच्या कर्जाचे पुनर्गठन करणे आवश्यक आहे, त्याबाबतची माहिती जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापकांनी त्वरित द्यावी. तसेच २ ऑक्टोबर रोजी होणा-या ग्रामसभेत कर्जाच्या पुनर्गठन संदर्भात माहिती देण्यासाठी बँक अधिका-यांना उपस्थित राहण्याचे निर्देश द्यावे.शेतीशी निगडीत कर्जाच्या वसुलीस स्थगिती अंतर्गत बँकांना लेखी आदेश द्यावे. वसुली होत




असल्यास व याबाबत तक्रार आली तर संबंधित बँकेवर कारवाई करावी. दुष्काळग्रस्त तालुक्यातील प्रत्येक ग्राम पंचयतीमध्ये रोजगार हमी योजनेअंतर्गत किमान एक काम हाती घ्यावे. कृषी पंपाच्या चालू विजबिलात सूट संदर्भात महावितरणने नियोजन करावे. दुष्काळ निवारणासाठी वेगवेगळ्या विभागांनी जिल्हा नियोजन समितीच्या निधीमधून प्रस्तावित कामे हाती घ्यावीत. या कामांची माहिती २ ऑक्टोबरच्या ग्रामसभेत गावक-यांना द्यावी. तसेच उपविभागीय आणि तहसील स्तरावर सर्व विभागांची बैठक घ्यावी, अशा सुचना जिल्हाधिकारी वसुमना पंत यांनी दिल्या.बैठकीला निवासी उपजिल्हाधिकारी दगडू कुंभार, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी शंकर तोटावार, उपजिल्हाधिकारी (रोहयो) शुभम दांडेकर, विभागीय वन अधिकारी राजन तलमले, उपमुख्य कार्यकारी अधिकारी गिरीश धायगुडे, पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. सुरेश कुमरे, जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक आशिष सोनोने, जिल्हा पुरवठा अधिकारी राहुल बहादुरकर, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी सलिम शेख आदी उपस्थित होते.

अशा आहेत १२ प्रकारच्या उपाययोजना व सवलती : दुष्काळग्रस्त क्षेत्रासाठी राज्य शासनाने विशेष बाब म्हणून पुढीलप्रमाणे सवलती लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. यात १) जमीन महसुलात सुट २) पीक कर्जाचे पुनर्गठन ३) शेतीशी निगडीत कर्जाच्या वसुलीस स्थगिती ४) कृषी पंपाच्या चालू विजबिलात सुट ५) शालेय / म हाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परिक्षा शुल्कात सुट ६) रोहयो अंतर्गत कामाच्या निकषात शिथिलता आणून जास्तीत जास्त कामे सुरू करणे ७) आवश्यक तेथे पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी टँकर्सचा वापर ८) टंचाई जाहीर केलेल्या गावात शेतक-यांचा शेतीच्या पंपाची वीज जोडणी खंडीत न करणे ९) शेतीवर आश्रित शेतकरी / मजूर आदींना अन्नधान्याची टंचाई होणार नाही याबाबत व्यवस्था उभी करणे १०) जनावरांना आवश्यक चारा उपलब्ध होईल, याची व्यवस्था करणे ११) जलसंधारणाची कामे सुरू करणे ) नागरिकांना पिण्याचे पाणी आणि जनावरांसाठी पाण्याचे नियोजन करणे.

## थोडक्यात बातम्या

# शिरपूर तालुक्यात दुष्काळ पंचनामे सुरू

**अक्षराज : नंदकुमार बोरसे**



**दि.२९, शिरपूर (धुळे) :** म हाराष्ट्र शासनाने नुकत्याच दुष्काळ घोषित केलेल्या तालुक्यांमध्ये शिरपूर तालुक्याचा देखील समावेश करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने दिनांक २८ ऑक्टोबर रोजी तहसील कार्यालय शिरपूर येथे सर्व तालुकास्तरीय व ग्रामस्तरीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची बैठक घेण्यात आली. सदर बैठकीस तहसीलदार म हेंद्र माळी, तालुका कृषी अधिकारी गोपाल, सर्व मंडळ अधिकारी, मंडळ कृषी अधिकारी, कृषी पर्यवेक्षक, ग्राम महसूल अधिकारी व सहाय्यक कृषी अधिकारी उपस्थित होते. यावेळी पंचनामे करण्यासाठी गाव निहाय पालक अधिकारी म्हणून ग्राम महसूल अधिकारी व सहाय्यक कृषी अधिकारी यांची नेमणूक करण्यात आली. त्यांचे मार्फत नेमून दिलेल्या गावाचे पंचनामे करण्याची कार्यवाही १० ऑक्टोबर पर्यंत पूर्ण करण्याबाबत तहसीलदार महेंद्र माळी यांनी आदेशित केले आहे. कुणीही पात्र खातेदार पंचनामा अथवा मदतीपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घेण्यात बाबत सर्वांना सुचित करण्यात आले.

शिरपूर तालुक्यातील सर्व खातेदारांना याद्वारे आवाहन करण्यात येते की, त्यांनी आपल्या गावाला नेमून दिलेल्या ग्राम महसूल अधिकारी अथवा सहाय्यक कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करून आपल्या पिकाचे पंचनामे करून घेण्याची कार्यवाही करावी. तसेच आपला फार्मर आयडी, आधार कार्ड व बँक तपशील संबंधित पालक अधिकारी यांच्याकडे सादर करावा.

# डोरली गावात बिबट्याने केली बकऱ्याची शिकार; गावकरी प्रचंड दहशतीत



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२९, नागपूर :** पारशिवनी तालुक्यातील डोरली गावात बिबट्याने गोठ्यात बांधून ठेवलेल्या एका बकऱ्याचा फडशा पाडला असून डोरली गाव परिसरातील नागरिक वर्गात प्रचंड दहशत निर्माण झाली आहे.प्राप्त माहितीनुसार डोरली गावाला लागून गोविंदा इंगोले यांचे घर आहे. घरालाच लागून गोठा आहे, इंगोले यांच्या घरा मागे रणजित गजभिये यांचे शेत आहे. २८ सप्टेंबर सोमवारला सायंकाळी ७.३० वाजता रणजित गजभिये यांच्या शेताकडून बिबट्या आला. यावेळी गोविंदा इंगोले यांच्या कोठ्यात बांधलेल्या बकऱ्याची शिकार केली. यावेळी बकऱ्याच्या किंचाळण्याचा आवाज एकताच इंगोले यांचे कुटुंब घटनास्थळी धावले मात्र बिबट्याने पळ काढला.सदर घटनेची माहिती पोलीस पाटील रिना मस्के यांना देण्यात आली. वनविभाग प्रशासनाला सूचना केल्या, यापूर्वी रमेश येवले यांच्या कोठ्यात बांधून असलेल्या तीन गाईच्या पिल्लांची बिबट्याने शिकार केली होती, मात्र त्याना आर्थिक नुकसान मिळाले नाही. मागील अनेक महिन्यापासून भानेगाव, बिना(संगम), सावली, शिंगोरी, डोरली परिसरात बिबट्याचा वावर आहे. मात्र बिबट्याला जेरबंद करण्यात वन विभाग प्रशासन अपयशी ठरले असून वनविभाग प्रशासनाच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

# शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी पतसंस्थेची ३६ वी वार्षिक सभा संपन्न

**अक्षराज : दिवाकर घेर**



**दि.२९, नागपूर :** शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्यादित संस्थेची ३६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतेच नागपूर येथील ना.सु.प्र. कर्मचारी वेलफेअर असोसिएशन सांस्कृतिक सभागृहात उत्साहात संपन्न झाली. सभेच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष विशाल बंड होते. याप्रसंगी सचिव बाळनाथ मानकर यांनी संस्थेच्या वार्षिक अहवालाचे वाचन केले. चालू आर्थिक वर्षात संस्थेने आर्थिक प्रगतीची नवी झेप घेत ३ कोटी ३६ लाख ५५ हजार ५५३ रुपयांचा निव्वळ नफा मिळवला असून संस्थेला सातत्याने 'अ' ऑडिट वर्ग मिळाल्याची माहिती त्यांनी दिली. या आर्थिक यशाच्या पार्श्वभूमीवर सर्व सभासदांना १० टक्के लाभांश वाटप करण्याचा निर्णय सभेमध्ये जाहीर करण्यात आला. संस्थेची एकूण सभासद संख्या आता ३ हजार ८२२ वर पोहोचली असल्याचे ही यावेळी नमूद करण्यात आले. वार्षिक सभेचे औचित्य साधून संस्थेतील सेवानिवृत्त सभासदांचा सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला. तसेच सभासदांच्या १० वी व १२ वीच्या गुणवंत पाल्यांसह क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचेही कौतुक करून त्यांना गौरविण्यात आले. सभेला उपाध्यक्ष विजय भांगे, सचिव बाळनाथ मानकर, सहसचिव अतुल टेकाडे, कोषाध्यक्षा सरला सातपुते, संस्थेचे माजी अध्यक्ष सूर्याजी राऊत, माजी अध्यक्षा विशाखा ठमके, कार्यशील संचालक व व्यवस्थापक प्रकाश धरममाळी यांच्यासह संचालक प्रशांत धरममाळी, प्रवीण नरुले, राजेंद्र सुके, अमोल देशमुख, राजेशकुमार कोकुड्डे, प्रमोद महल्ले, संजय ढुमणे, दिनेश ढगे, भूषण कडूकर, नामदेव तांबडे, रवींद्र हिवरकर, अगम आरेकर, सुरेश राठोड, भारती गोमकर, बालाजी महाले, भूषण बेलेकर, कर्मचारी वर्ग व बहुसंख्य सभासद उपस्थित होते. सभेचे आभार सहसचिव अतुल टेकाडे यांनी मानले.

# कोकच्या प्रिया कमलाकर मोरे यांची यवतमाळ जिल्हा परिषद शाळेत शिक्षक म्हणून निवड; गावकऱ्यांकडून उत्स्फूर्त सत्कार

**अक्षराज : रहीम कोक्कर**



**दि.२९, कोक (परभणी) :** जिंतूर तालुक्यातील कोक येथील प्रिया कमलाकर मोरे यांची यवतमाळ जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळेत शिक्षक म्हणून निवड झाल्याबद्दल गावकऱ्यांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. माजी जिल्हा परिषद सदस्य रामेश्वर जावळे यांच्या नेतृत्वाखाली आयोजित करण्यात आलेल्या या सत्कार समारंभास गावातील नागरिक व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रिया मोरे यांनी मिळविलेल्या या यशाबद्दल उपस्थितांनी त्यांचे अभिनंदन करत पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. ग्रामीण भागातील विद्यार्थिनीने शिक्षक पदापर्यंत मजल मारल्याने कोक गावाच्या शैक्षणिक क्षेत्रातही अभिमानाची भर पडली आहे. यावेळी भगवान झाडे, विठ्ठल रासवे, डॉ.महेश जावळे, कमलाकर मोरे, बाबाराव काठोळे, आबासाहेब रासवे, करीम पटेल,म ुंजा उगले, सय्यद इर्शाद, शेख इमरान, माणिक मोरे, अक्षय रासवे, किरण कसाब, कौसाराम काठोडे, माणिक शिंदे यांच्यासह गावातील नागरिक व मान्यवर उपस्थित होते.